# यशवंतराव दाते स्मृती संस्था, वर्धा





## डॉ. यशवंत सुमंत स्मृती युवा संशोधक प्रेरणा पुरस्कार

# मानपत्र

**डॉ. रणधीर शिंदे,** कोल्हापूर

मराठी समीक्षेच्या प्रांतातील नव्या पिढीचे आपण मुख्य शिलेदार आहात, मराठीच्या अध्यापनासह
अल्पकालावधीत आणि अल्पवयातच आपण सूक्ष्म निरीक्षणक्षमता, तटस्थता.
संशोधक वृत्ती आणि सातत्यपूर्ण काम करण्याची इच्छाशक्ती
या दुर्मिळ गुणांचा समुच्चय आपल्यात पूर्णपणे बाणला आहे.
म्हणूनच आपण मराठी समीक्षा क्षितिजावरचा तळपता तारा ठरला आहात.
कविता आपल्या आवडीचा विषय, 'दिलीप पुरुषोत्तम चित्रे' यांच्या समग्र कवितेच्या अभ्यासातून तो प्रगटतो.
'शरच्चंद्र मुक्तिबोध ; व्यक्ती आणि वाङ्मय' या ग्रंथातून
आपली आशयनिष्ठ समीक्षासृष्टी अधोरेखित होते.
त्याचवेळी आपण 'मर्ढेकरांच्या कवितेचा शैलीशास्त्रीय अभ्यास' ही हाती घेता,
सोबतच 'संतकवितेतील बौद्धप्रभाव'चे अन्वेषणही तेवढ्याच ताकदीने मांडण्याचे आव्हान
समर्थपणे पेलता, समीक्षेतील चौफेर मुशाफिरी जणू आपला छंदच झाला आहे.
तो आपल्यात अधिष्ठित असलेल्या वैचारिक निकटतेतून,
आपण महाराष्ट्राच्या समृद्ध विचारवारसा परंपरेतील 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे समग्र वाङ्मय खंड २'
या महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या बृहतप्रकल्पातील
दिलेला संपादन सहभाग महत्त्वपूर्ण मानला जातो.
या आपल्या अजोड आणि संशोधकवृत्तीचा गौरव
यशवंतराव दाते स्मृती संस्थेच्या
डॉ. यशवंत सुमंत स्मृती युवा संशोधक प्रेरणा पुरस्काराने
सन्मान करीत आहोत.

| प्रदीप दाते | प्रा. शेख हाशम | किशोर बेडकिहाळ | हिरण्मय भोळे |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | निमंत्रक | सदस्य |

यशवंतराव दाते स्मृती संस्था व डॉ. भा. ल. भोळे साहित्य पुरस्कार समिती, वर्धा.